Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - VII JULY 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# कार्ल मार्क्सचे इतिहासलेखन

**विश्वास गोरखनाथ वळवी**
संशोधक विद्यार्थी,
सामाजिक शास्त्रे प्रशाळा विभाग,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**प्रस्तावना :-**

एका ज्यु कुटूंबात जन्म घेतलेला मार्क्स पुढे जाऊन जागतिक व्यक्तिमत्त्व बनला आणि प्रत्येक राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला त्याच्या आर्थिक विचारांच्या मार्गातून जावेच लागते. मार्क्सने आपल्या विचारांचे सारांश साम्यवादाच्या जाहिरनाम्यात आणि दास कॅपिटल या दोन ग्रंथात दडवून ठेवला आहे. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली आणि जागतिकीकरणाच्या माध्यमातून ती अनेक युरोपियन देशात फोफावली. पुढे जगाला दोन महायुध्दातून स्वत:ला सावरायला भरपूर वेळ लागला. पण युरोपियन राष्ट्रांनी भांडवलशाहीच्या माध्यमातून आपली पकड विकसनशील राष्ट्रांवर पकडून ठेवली. लेनीनने रशियात तर माऊ त्सुंगने चीनमध्ये साम्यवादी विचारसरणीच्या आधारे राष्ट्रे स्थापन केली. पण भांडवलाच्या आधाराने ती पुढे कोलमडून पडली. १९९१ मध्ये गोर्बाचेव्ह यांनी राजीनामा देऊन वार्सा करार रद्द केला आणि साम्यवादाचा कणा मोडून दिला. जगात आपले वेगळे अस्तित्त्व निर्माण करण्याच्या नादात भारत, आफ्रिका आणि अनेक राष्ट्रांनी अलिप्ततावादाची चळवळ राबवली, पण ती राष्ट्रांना हितकारक ठरली नाही. भांडवलशाही आणि अलिप्ततावाद याबरोबरच कार्ल मार्क्स याने आर्थिक तत्त्वांचा जाहीरनामा जाहीर केला. त्याने जगावर कधी न संपणारा मार्क्सवाद निर्माण केला.

**कार्ल मार्क्स आणि त्याचे सुरुवातीची कार्ये :-**

लहानपणी कार्ल मार्क्सला आर्थिक छळ सहन करावा लागला. जन्माने ज्यु असलेल्या कार्ल मार्क्सच्या परिवाराला आर्थिक अभावाद्वारे जबरदस्तीने ख्रिश्चन धर्मात जावे लागले. म्हणून कार्ल मार्क्स धर्माला अफूची गोळी म्हणतो. तसेच जागतिक इतिहास आर्थिक छळातून डागवला गेला असे त्याचे मत बनले. "Karl Marx (५ May १८१८ - १४ march १८८३) was a German philosopher, economist, historian, sociologist, political theorist, journalist and socialist revolutionary... marxs theories about society economics and politics, collectively understood as Marxism hold that human societies develop through class struggle in capitalism this manifests itself in the conflict between the ruling clases."[१] ज्या जर्मनीने पहिल्या महायुध्दात आर्थिक छळ सहन केला आणि दुसऱ्या महायुध्दात पराभव अशा जर्मनीत कार्ल मार्क्सचा जन्म झाला. एवढेच की, दिडशे वर्षाच्या अंतकाळात मार्क्सच्या तत्त्वावर जर्मनीने पाय ठेवला नाही. तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून आपले विचार मार्क्सने मांडलेच, पण ऐतिहासिक भौतिकवादाचा सिध्दांत मांडून हेगलच्या सिध्दांताला तडा दिला. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून आहे रे आणि नाही रे यांच्या सामाजिक अवस्था मांडून इतिहास म्हणजे वर्गकलह ही जागतिक व्याख्या केली आहे. सुरुवातीच्या काळात "Karl Marx researching in the reading room of the British Museam his best-known titles art the १८४८ pamplet, the communist manifesto and the three volume Das Capital his political and philosophical thought had enormous influence on subsequent, intellectual, economic and political history and his name has been used as an adjective a noun and a school social theory."[२] कार्ल मार्क्सने आपल्या सुरुवातीच्या काळातच साम्यवादी विचारातून आर्थिक तत्त्वाचे विचार दाखवून दिले आणि समाजशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, तत्वज्ञान, राज्यशास्त्र या विषयातून आपले विचार लिखाणाच्या माध्यमातून मांडायला सुरुवात केली. पुढे मार्क्सचा मित्र आणि स्नेही एंजेल्स फ्रेडरिक्स याने मार्क्सवादी तत्त्वात महत्त्वपूर्ण भर घातली.

**कार्ल मार्क्स आणि त्याचे महान विचार :**

कार्ल मार्क्सने आपल्या तत्त्वातून अनेक महान विचार जगाला प्रदान केले आहे.

१) "Religion is the opium of the masses.

२) Religion is the importance of the human mind to deal with occurrences it cannot understand.

३) The theory of communism may be summed up in one sentence, Abolish all private property.

४) If anything is certain it is that I myself am not a Marxist."३

धर्मसत्ता ही नेहमीच सामाजिक सुधारणेच्या आड आलेली आहे. म्हणुन मार्क्स धर्माला अफुची गोळी म्हणतो. युरापीयन राष्ट्रांनी धर्मसत्ता आणि राज्यसत्ता यांच्या आर्थिक पिळवणुकीचा अनुभव घेतलेला आहे. एकंदरीत धर्म हा राज्यसत्तेचा आणि समाजसत्तेच्या सुधारणेत भूमिका बजावू शकत नाही, असे मार्क्सचे मत होते.

**मार्क्सवाद म्हणजे काय ?**

मार्क्सवादानंतर नवमार्क्सवाद हा नवीन प्रवाह या विचारात आज आधुनिक लिखाणात रुजू झालेला आहे. मार्क्सवाद म्हणजे

काय आणि मार्क्सवादातून नेमके काय प्रदर्शित होते, याचा अभ्यास महत्त्वाचा आहे. "कोसंबी यांच्या मते, इतिहास म्हणजे केवळ घटनांची कालानुक्रमानुसार केलेली नोंद नाही किंवा महान व्यक्तींच्या कार्याची निवडही नाही तर उत्पादन साधने आणि उत्पादन प्रक्रियेतील भिन्न घटकांचे संबंध यात काळानुसार होत गेलेल्या परिवर्तनाची मिमांसा म्हणजेच इतिहास होय."[४] कोसंबीच्या मते, इतिहास हा फक्त नोंदीच नाही ज्यात राजेशाहीचा आणि राजांचा इतिहास असतो. संपूर्ण काळात उत्पादक आणि उत्पन्न काढणारा वर्ग यात जो संबंध असतो आणि या संबंधात जो संघर्ष घडून आलेला आहे, तो म्हणजे इतिहास. आता हा इतिहास मांडतांना अर्थ या दोन शब्दांचा इतिहास मोठा होऊन प्रशांत महासागरासारखा दिसतो. पण या आर्थिक मक्तेदारीतच खरा इतिहास दडलेला आहे आणि हाच इतिहास म्हणजे मार्क्सवाद होय, असे आपण म्हणू शकतो. कोसंबीच्या लिखाणात कार्ल मार्क्सचा मार्क्सवाद हा दिसून येतो. रोमिला थापर यांनी सामाजिक अर्थवाद तर डी.डी.कोसंबी यांनी ऐतिहासिक अर्थवाद मांडला आहे, ज्यातून आपल्याला मार्क्सवाद म्हणजे काय, हे दिसून येते.

"पाश्चात्य मार्क्सवाद हा पश्चिमेतील मार्क्सवादाचे तात्त्वीक चिंतन आहे. या चिंतनाचे थेट राजकीय परिणाम आहेत. मात्र पाश्चात्य मार्क्सवाद हा थेट राजकीय स्वरुपाचा नाही. यशस्वी राजकारणासाठी मार्क्सवादाच्या तात्वीक आधाराचा पुनर्विचार करणे, हे पूर्वअट मानली गेली."[५] आशियासारख्या विकसनशील खंडात अनेक राष्ट्रांची साम्राज्यवादी राष्ट्रांनी आर्थिक पिळवणूक केली. इंग्लंड राष्ट्राचा सुर्य या खंडात कधी मावळला नाही. मार्क्सने साम्यवादाचा जाहिरनामा आणि दास कॅपिटल या ग्रंथाच्या माध्यमातून या आर्थिक पिळवणूकीची वाचा फोडली. सगळ्यात पहिले युरोपात आणि मग ज्या राष्ट्रांच्या विचारवंतांनी मार्क्सवाद स्विकारला, त्या राष्ट्राला आर्थिक गुलामगिरीतून सुटका करुन घेण्याचा मार्ग सापडला.

**कार्ल मार्क्स आणि वर्गकलहाची व्याख्या :-**

वर्गकलह कार्ल मार्क्सची प्रसिध्द व्याख्या आहे. अर्थाच्या माध्यमातून झालेला तो संघर्ष आपल्या व्याख्येतून मार्क्स प्रदर्शित करतात. "The human is history but class struggle साम्यवादी विचारप्रणालीचा जनक कार्ल मार्क्सने वर्गकलह म्हणजे मानवी इतिहास होय... सर्व संघर्षाच्या मुळाशी आर्थिक व्यवहार असतात, हा मार्क्सच्या सिध्दांताचा मुख्य आशय आहे. कालानुरुप संघर्षाचे स्वरुप बदलले पण संघर्ष कायम आहे व हा संघर्ष आपण इतिहासातून अभ्यासतो, असे त्याचे ठाम मत आहे. मार्क्सच्या मते, इतिहास लिहिण्याच्या आधी इतिहासकार हा इतिहासाचे अपत्य असतो."[६] कार्ल मार्क्सने इतिहासाची व्याख्या करतांना संघर्षाच्या मुळाशी आर्थिक तत्व असते आणि या तत्त्वातून सामाजिक अवस्था एकमेकांच्या संघर्षातून जात असते. त्या संघर्षाचे मुळ अर्थ असते. जातीयवादाची मुळे जरी या संघर्षात महत्त्वाची होती पण आपण असे म्हणू शकतो. आर्थिक पिळवणूकीसाठी उच्चवर्णियांनी निम्न वर्गीयांची जातीयतेच्या आधारे पिळवणूक केली आणि जसा काळ बदलत गेला तसे इतिहास या टप्प्याचे स्वरुप देखील बदलत गेले. मार्क्स म्हणतो, इतिहासकार देखील याच पिळवणूकीचे अपत्य आहे. इतिहास लिहीण्याआगोदर इतिहासकार इतिहासाचा आर्थिक पात्र असतो. "कार्ल मार्क्सने वर्गकलह म्हणजे इतिहास होय, असे मत व्यक्त केले. कार्ल मार्क्स हा साम्यवादी विचार प्रणालीचा संस्थापक होता. त्याच्या मते, इतिहासात प्रामुख्याने संघर्ष अथवा लढा हा प्रमुख घटक असतो. तो सातत्याने दोन वर्गात होत असतो. हे दोन वर्ग म्हणजे आहे रे आणि नाही रे हे होय. कार्ल मार्क्सने हे जे इतिहासाविषयी तत्त्वज्ञान मांडले आहे, त्यात मार्क्सवादी दृष्टीकोनातून मांडलेले इतिहासाचे तत्त्वज्ञान म्हटले जाते."[७] कार्ल मार्क्सने आहे रे आणि नाही रे ही दोन तत्त्वे मांडली आणि इतिहासाची आर्थिक तत्त्वे समजविण्याचा प्रयत्न केला. मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवादातून हा सिध्दांत सर्वदूर केला. हेच इतिहासाचे तत्वज्ञान मांडत असतांना हेगलचा भौतिकवाद समजणे फारच अगत्याचे होऊन बसते. नाहीतर हा वर्गकलहाचा लढा समजण्यास अडचणी उत्पन्न होऊ शकतात. एकंदरीत कार्ल मार्क्सने त्याची ऐतिहासिक व्याख्या वर्गकलह ही समजण्यास वाचकांना पुरेशी आहे.

**कार्ल मार्क्सच्या ग्रंथावरील भाष्य :**

कार्ल मार्क्सचा विचार हा त्याच्या अनेक ग्रंथातून प्रदर्शित होतांना दिसतो. हे ग्रंथ खऱ्या अर्थाने साम्यवादाचे पुरस्कार करणारे आहेत. साम्यवादाचा जाहिरनामा म्हणजेच अनेक कामगारांच्या मुक्तीचा ग्रंथ होय. दास कॅपिटल या ग्रंथातून अर्थाचे खरे स्वरुप मार्क्स मांडतो. आपल्या ग्रंथातून सामाजिक न्यायापासून उत्पादन करणाऱ्या कामगारांच्या हक्काची खरी मालकी प्रस्तुत करतांना कार्ल मार्क्स धजत नाही. "विसाव्या शतकाच्या मध्यात युरोपात मार्क्सवादाचे स्वरुप १९१४ च्या द्वितीय इंटरनॅशनलचा पाडाव आणि त्यानंतरच्या दशकात पश्चिम युरोपातील कामगार चळवळीचे पराभव यामुळे प्रभावी झाले होते. या पाडावानंतर मार्क्सवादी विचाराचे केंद्र सुरुवातीला पुर्वेकडे हलले... भौगोलिकदृष्ट्या मार्क्सवादी विचार मोठे साम्यवादी पक्ष असणाऱ्या जर्मनी, फ्रान्स आणि इटली या देशात केंद्रीत झाला. मार्क्स याने तत्वज्ञानापासून सुरुवात केली आणि ते अर्थशास्त्राकडे वळले."[८] कार्ल मार्क्सच्या ग्रंथांच्या विचारामुळे जागतिक परिणाम घडून आले. मार्क्सच्या विचारांवर लेनिनच्या रशियात कामगार आणि आर्थिक सुधारणेच्या माध्यमातून साम्यवादी राष्ट्र स्थापन केले. तसेच चीनमध्ये लाल क्रांती घडून आली आणि राजेशाहीचा अस्त झाला. माऊ त्सुंग याने साम्यवादी चीन राष्ट्राची स्थापना केली. मार्क्सच्या ग्रंथाद्वारे जे विचार मांडले गेले ते आजतागायत प्रत्येक राष्ट्रावर परिणाम करत आहेत.

**Books of Karl Marx**

| Sr. No. | Name of the Book | Period |
|---|---|---|
| १ | Holy Family | |
| २ | Poverty of Phylosophy | १८४७ |
| ३ | The Comunist Manifesto | १८४८ |
| ४ | Das Capital | १८६७ |
| ५ | Class Struggle in France | १८७०-१८७१ |
| ६ | Goutha Programme Revolution and Counter-Revolution | |

"मार्क्सवाद शब्द से साधारण यह प्रतित होता है की, मार्क्सवाद एक विचारधारा है जिसका आधार मार्क्स के विचार है। पर संबंध में वास्तविकता यह नहीं है। १९ वी शताब्दी में जर्मनी में कार्ल मार्क्स (१८१८-१८८३)और फ्रेडरीक एंगेल्स (१८२०-१८९५) नामक दो महान विचारक हुए थे। जिस विचार संप्रदाय को हम मार्क्सवाद कहते है। उसके निर्माण में एंगेल्स का योगदान भी उतना महत्त्वपूर्ण था, जितना कार्ल मार्क्स का था। फिर भी इतिहास ने उस विचार संप्रदाय को यदी मार्क्सवाद का ही नाम दिया है।"[९] कार्ल मार्क्सच्या मृत्यूनंतर त्याची ग्रंथसंपदा विशेषत: फ्रेडरीक एंगल्स याने प्रसिध्द केली. मार्क्सवाद ही विचारप्रणाली जरी मार्क्सच्या नावावरुन ठेवली असली तरी एंगेल्सचे कार्य आणि त्याने जे पुढील लिखाण केलेले आहे, ते मार्क्सवादी विचारसरणीसाठी मोलाचे आहे.

१) **पॉवर्टी ऑफ फिलॉसॉफी :** कार्ल मार्क्सने या ग्रंथाला फ्रेंच भाषेत लिहीले. निराकरण म्हणून या ग्रंथाच्या माध्यमातून उत्तरे दिली. मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवादाची पूर्ण माहिती आणि व्याख्या या ग्रंथात दिलेल्या आहेत. तसेच समाजाची आर्थिक स्थिती ही इतिहासाच्या परिवर्तनाला कशी कारणीभूत ठरली, याचे भाष्य ते मांडतात.

२) **कम्युनिस्ट मेनिफेस्टो :** मार्क्सने साम्यवादाचा जाहीरनामा जाहीर केला. या जाहीरनाम्यातून भांडवलकर्ता यांना मोठा चाप बसला. कारण सर्व कामगार वर्ग या जाहीरनाम्यातून एकत्रीत प्रदर्शित होणार होती. या कम्युनिस्ट मेनिफेस्टोद्वारे कार्ल मार्क्सने आवाहन केले, त्याचे प्रसिध्द वाक्य म्हणजे, "सर्व कामगार वर्ग एकत्र या".

३) **दास कॅपिटल :** दास कॅपिटल हा ग्रंथ लिहीतांना कार्ल मार्क्स आपली मानसिक शक्ती पणाला लावली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. "दास कॅपिटल मार्क्स को अमर कर देनेवाली उसकी वैज्ञानिकता पूर्ण कृती है। कॅपिटल को पूरा करने के लिए मार्क्स को १८ वर्षो तक घोर तपस्या का जीवन व्यतित करना पडा। कॅपिटल को मार्क्सने तीन भागों मे लिखा है। दास कॅपिटल एकार से पुंजिवादी संचयन के विकास का ऐतिहासिक विवेचन करती है। इसी प्रकार दुसरी व तिसरी जिल्द मे भी विभिन्न आर्थिक समस्याओं एवं सिध्दांतो पर विवेचन किया गया है। कॅपिटल मे मार्क्स ने पुंजिवाद की उत्पत्ती पर ऐतिहासिक रुप से प्रकाश डाला है।"[१०] दास कॅपिटल या ग्रंथातून अतिरिक्त मुल्य म्हणजे कामगारांना पुर्ण श्रमाचे पैसे न देता त्यांना कमी पैसे आणि जास्त काम या तत्त्वावर राबविले जात असे. मार्क्सने दास कॅपिटल या ग्रंथाच्या द्वारे पिळवणूकदारांची कामगार वर्गापुढे वाचा फोडली. म्हणून इरफान हबीब म्हणतात, "आजपर्यंतच्या मानव जातीचा इतिहास म्हणजे वर्गकलह. हा मार्क्सवादाचा पायाच आपण विसरलो आहोत. त्याच्यामते, प्रत्येक समाजरचनेमध्ये पूर्वीच्या समाजरचनेच्या विरोधात अंतर्गत विरोध असतोच व त्यातून नवा समाज निर्माण होतो, त्यामुळे प्रत्येक समाज, वर्ग व त्यातील कलह हा अपरिहार्य असतो."[११]

**कार्ल मार्क्सचा मृत्यू :**

कार्ल मार्क्सचा मृत्यू हा शारीरिक होता. पण मानसिक रुपाने त्याचे विचार त्याच्या जिवीत कृत्याद्वारे आणि अनेक ग्रंथांद्वारे आजही मार्क्सवादी तत्वप्रणालीच्या रुपात अनेक राष्ट्रांत जीवंत आहेत. "Karl Marx died on March १४, १८८३, when he was ६४, after succumbing to a Bout of bronehitis. Not owning any land when he died. He was in London's Highgate cemetery. Origionally, his headstone was non-descript, but in १९५४ the communist party of gret Britain etched the stone with. 'Workers of all lands unite', The last line of the communist manifesto, along with a quote from marxs theses on Feuerbach(१८४५)"[१२]

**संदर्भसूची :-**

१) en.wikipedia.org/wiki/karl-marx, Date १२/०३/२०१९, १२.४२PM
२) Ebid, Date १२/०३/२०१९, १२.३९PM
३) Acchikhabar.com/२०१३/०१/२७/karl-marx-quotes-in-hindi/ Date १२/०३/२०१९, Time १२.१९ PM
४) इतिहास लेखनशास्त्र, डॉ.सातभाई श्रीनिवास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, २०१५, पृ.क्र. २७०.
५) इतिहास लेखनातील नवे प्रवाह, प्रा.वांबुरकर जास्वंदी, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०१४, पृ.क्र. ११५.
६) इतिहास लेखनशास्त्र, डॉ.सातभाई श्रीनिवास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २०१५, पृ.क्र. १०.
७) पुर्वोक्त, पृ.क्र. २६७.
८) पुर्वोक्त, पृ.क्र. ११४.
९) कार्ल मार्क्स, दिप्ती शर्मा, एम.कुमार, अर्जुन पब्लिकेशन हाऊस, दिल्ली, प्रथम संस्करण, २०११, पृ.क्र. ०१.
१०) उपरोक्त, पृ.क्र. ९८.
११) पुर्वोक्त, पृ.क्र. २२०-२२१.
www.britannica.com/biography/karl-marx, Date १२/०३/२०१९, Time १२.५५PM